**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी – १८**
**ब प्रभाग आरोग्य विभाग**
**पत्र क्र बप्र/६/कावि/ ९१३३ /०१३**
**दिनांक – २१ /११ /०१३**

**विषय – मासिक हजेरी व संस्थाच्या बिला संदर्भातील अहवाल वेळेत सादर करणे बाबत.**

**परिपत्रक,**

सर्व आरोग्य निरिक्षक यांना कळविण्यांत येते की, पगार बिलासाठी लागणारी हजेरी दर महिन्याच्या २० तारखेपुर्वी सादर करणे आवश्यक आहे. परंतु याबाबत वारंवार तोंडी अथवा लेखी सुचना देवून देखिल काही आरोग्य निरिक्षक यांचेकडील हजेरी विहीत मुदतीत प्राप्त होत नाही. त्यामुळे पगार बिल करणे बाबतची कार्यवाही करणेस विलंब होत आहे.सबब,या परिपत्रकाव्दारे सर्व आरोग्य निरिक्षक यांना सुचित करणेत येत कि, त्यांनी त्यांची हजेरी व्यक्तीश: लक्ष घालून २० तारखेच्या आत सादर करणेची दक्षता घेणेत यावी.

तसेच ब प्रभाग अंर्तगत असलेल्या शौचालय साफ सफाई , रस्ते गटर्स साफ सफाई व आरोग्य विषयक इतर कामकाजासाठी नेमलेल्या संस्थाचे बिला विषयक , मुदतवाढी विषयक अहवाल मुदतीत सादर करावेत. सदर अहवाल स्वयंस्पष्ट व मुख्य आरोग्य निरिक्षक यांचे शिफारस घेवून सादर करणेची दक्षता घेणेत यावी.

सही / -
**सहाय्यक आरोग्याधिकारी**
**ब प्रभाग आरोग्य विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**चिंचवड - ३३**

**प्रति,**
**सर्व आरोग्य निरिक्षक**